भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

FIVE HUNDRED RUPEES

रु. 500

Rs. 500

पाँच सौ रुपये

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

BL 140704

© 2021 ©

महाराष्ट्र MAHARASHTRA

अनु.क्र. 282 दि. 03/04/22 मु.शु.रक्कम 500/-

दस्ताचा प्रकार हमीपत्र

दस्त नोंदणी करणार आहात का ? होय/नाही.

मिळकतीचे वर्णन

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव मे. के. के. इंटरप्रायझेस

पत्ता पिंपळे गुरव, पुणे

दुसऱ्या पक्षकाराचे नांव P.M.R.D.A. पुणे

हस्ते व्यक्तीचे नांव व पत्ता विश्वास सुधीर जाधव / पिंपळे गुरव

मीना रमेश जाधव

परवाना क्र. २२०१०६०

मुद्रांक विक्रेत्याची सही ... मनोहर कॉलनी, पिंपळे गुरव, पुणे - २७

वरिष्ठ कोषागार अधिकारी पुणे

सत्यमेव जयते

0 6 APR 2022

प्रथम मुद्रांक लिपीक कोषागार पुणे करिता

NOTARY GOVERNMENT OF INDIA

हमीपत्र

(७४)

हमीपत्र

हमीपत्र आज दि . ११ माहे एप्रिल सन २०२२ इसवी ते दिवशी ते पुणे येथे.

श्री. प्रतिक सुभाष हुलावळे व इतर ४ तर्फे कु. मु. धा. मैं. के. के. डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री.किरण सुरेश शिंदे व श्री.किशोर सुरेश शिंदे धंदा :- व्यापार, राहणार :- रामनगर,कोकाटे हॉस्पिटल जवळ पिंपळे गुरव,पुणे ४११०६१.

मौजे हिंजवडी, ता. मुळशी, पुणे. येथील गट नं. १४०/१/१ यांसी एकूण क्षेत्र ३८००.०० चौ.मी. या मिळकतीमध्ये निवासी पध्दतीचा फ्लॅटचे बांधकामाबाबत प्रस्ताव जागामालक म्हणून आम्ही दाखल केला आहे. तूर्त या जागी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे / ग्रामपंचायत कडून पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकत नाही. याची माहिती आम्हाला देण्यात आली असून याला पर्याय म्हणून जागेवरील बोअरद्वारा पाणी उपलब्ध करून देण्याची किंवा टँकरद्वारा पाणी मिळण्याची व्यवस्था करीत आहोत. व त्यासंबंधी आवश्यक त्या वरीस्ठ भूवैज्ञानिक अधिकारी, भूजल सव्हेक्षण आणि विकास योजना (G.W.S & D.A.) या कार्यालयामार्फत किंवा तत्सम तांत्रिक सल्लागार्मार्फात सदर जागी पाणी असल्याबद्दचे प्रमाणपत्र आणून देणेची कार्यवाही करणे आमच्यावर बंधनकारक राहील.

२) इमारत पूर्ण झाल्यावर इमारतीमधील निवासी व वाणिज्य वापरासाठी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे / ग्रामपंचायत पिण्यासाठी पुरेसा पाणीपुरवठा पुरेशा दाबाने करू शकत नसल्यास पाण्याची पर्यायी व्यवस्था प्रवर्तक या नात्याने इमारतीमधील रहिवाशांच्याखर्चाने करून देण्यास तयार असून त्याची सर्व जबाबदारी आम्ही या हमीपत्राद्वारे स्वीकारत आहे.

३) पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे / ग्रामपंचायत मार्फत कोणताही पाणीपुरवठा सुरु न झाल्यास किंवा अपुरा झाल्यास आम्ही कोणत्याही कोर्टाकडे या बाबतीत दावा दाखल करणार नाही.

४) निवासी गाळ्याचे विक्रीचे बुकिंग करताना येणाऱ्या करारनाम्यात पाणीपुरवठयाची वरीलप्रमाणे सर्व वस्तुस्थिती विशेष बाब म्हणून नमूद करून घेण्याची जबाबदारी राहील. जागेवरील परीस्थितीची जाणीव नियोजीत गाळेधारकाना करून दिल्यानंतर सुद्धा या ठिकाणी होणाऱ्या बुकिंगनंतर होणाऱ्या नियोजित गाळेधारकाना पाणीपुरवठा अपुरा झाला तर पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे / ग्रामपंचायत चा पुरेसा पाणीपुरवठा सुरु होईपर्यंत फ्लॅटधारकांच्या रहिवाशांच्या खर्चाने पुरेसा पाणीपुरवठा करून देण्याची आमची

जबाबदारी राहील. पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे / ग्रामपंचात ला तोशीष लागू देणार नाही.

५) टँकरद्वारा किंवा बोअरद्वारा मिळणाऱ्या पाण्याचे नमुने वेळोवेळी प्रयोगशाळेतून तपासून आणणे व त्या रीपोर्टनुसार पाणी योग्य आढळल्यास पाणी वापरण्यात येईल याची आम्ही काळजी घेऊ.

६) सदरची योजना संपूर्णरीत्या प्रवर्तक / मालक या नात्याने आम्ही अन्य कोणास भविष्य काळात विकल्यास नवीन मालक / प्रवर्तकास या हमीपत्रातील सर्व बाबींची लेखी कल्पना देईन त्याचा समावेश नवीन करारनाम्यात करण्यात येईल याची काळजी घेईन / घेऊ.

७) हे हमीपत्र आमचे वालीवारसांवर बंधनकारक राहील.

८) सदर फ्लॅटमधील संदर्भातील कोणत्याही होणाऱ्या करारामध्ये या हमीपत्राचा समावेश करण्यात येईल व हे हमीपत्र करारनाम्यातील विशेष बाब म्हणून समजण्यात येईल.

वरील हमीपत्र मी राजीखुशीने दि. ११/ ०४/ २०२२ रोजी लिहून दिले आहे.

पुणे
दिनांक :- १३/ ०४/ २०२२

हमीपत्र लिहून देणार

श्री. प्रतिक सुभाष हुलावळे व इतर ४ तर्फे
कु. मु. धा. मे. के. के. डेव्हलपर्स तर्फे भागीदार

श्री.किरण सुरेश शिंदे व

श्री.किशोर सुरेश शिंदे

2

ATTESTED
SUNANDA R.GAIKWAD
NOTARY GOVT. OF INDIA
PUNE DIST

18 APR 2022

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL